| | |
|---|---|
| MHYA050055582016 | आर्बिटेशन आर.डी. क्र. २४१/२०१६<br>मे.श्रीराम –वि– प्रकाश बन्सी राठोड व एक |

**निशाणी क्र. १ खाली आदेश**
**(दिनांक २३/०९/२०२४)**

वारंवार पुकारा केला. उभय पक्षकार गैरहजर. प्रकरण ऋणकोविरुध्द परिणामकारक पुर्तता करण्याकीरता प्रलंबित.

२. मागील अनेक तारखांपासून प्रकरण एकाच टप्प्यावर प्रलंबित. धनकोने दरखास्त अर्जाच्या प्रगतीकरीता कोणतीही पुर्तता केलेली नाही. ऋणकोविरुध्द अंमलबजावणी होण्याकरीता कोणतीही पुढील तजवीज धनको घेत नाही. त्यामुळे प्रकरण अनेक तारखांपासून एकाच टप्प्यावर विणाप्रगती पडून आहे. त्यामुळे न्यायाचा कोणताही हेतु साध्य होताना दिसून येत नाही. धनकोच्या वर्तणुकीवरुन असे स्पष्ट होत आहे की, प्रकरण पुढे चालविण्याची आणि अंमलबजावणीच्या कार्यवाहीत रक्कम वसुल करण्याकारीता कोणतीही ठोस पावले उचलण्याची धनकोची तयार नाही. सबब, न्यायालयात खालीलप्रमाणे आदेश पारीत करावा लागत आहे.

**आदेश**

१. धनकोला याव्दारे असे आदेशीत करण्यात येते की, अवार्डनुसार रक्कम वसुल करण्याकरीता ऋणकोविरुध्द परिणामकारक तजवीज करावी.

२. ऋणकोविरुध्द रक्कम वसुल करण्याकरीता परीणामकारक तजवीज धनकोने करण्याचे टाळल्यास प्रस्तुत प्रकरण धनकोला पुढे चालविण्याची इच्छा नाही असे गृहीत धरुन न्यायालय प्रस्तुत प्रकरण तजवीज न केल्यामुळे खारीज करेल, याची धनकोने नोंद घ्यावी.

**(एस. एन. नाईक)**
दिनांक २३/०९/२०२४ दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,
पुसद.